**कृपया प्रसिध्दिसाठी** **19 मार्च 2009**

# श्री. राम नाईक यांच्या कार्यवृत्ताचे रविवारी प्रकाशन

**मुंबई, गुरुवार** : भाजपा नेते व माजी पेट्रोलियम मंत्री श्री राम नाईक यांच्या वार्षिक कार्यवृत्ताचे प्रकाशन शिवसेना नेते व लोकसभेचे माजी अध्यक्ष श्री मनोहर जोशी यांच्या हस्ते व माजी केंद्रिय मंत्री श्री. रवि शंकर प्रसाद यांच्या प्रमुख उपस्थितीत येत्या रविवारी करण्यात येणार आहे, अशी माहिती भारतीय जनता पार्टी - उत्तर मुंबई जिल्हाध्यक्ष श्री योगेश सागर यांनी आज प्रसिद्ध केलेल्या पत्रकात दिली आहे.

अधिक माहिती देताना श्री योगेश सागर यांनी सांगितले की जनप्रतिनिधी म्हणून 1978 मध्ये पहिल्यांदा निवडून आल्यापासून श्री राम नाईक सतत मतदारांना, ते करीत असलेल्या कार्यांची माहिती वार्षिक अहवालांच्या माध्यामातून देत आलेले आहेत. लोकशाहीची ही परंपरा गेल्या निवडणुकीचा विपरीत निकाल लागल्यानंतरही त्यांनी गेली चार वर्षेही अखंड ठेवली आहे. भारतीय जनता पार्टी व शिवसेना कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत 14 व्या लोकसभेच्या कालावधीतील शेवटचा आणि पाचवा वार्षिक अहवाल आता ते प्रसिद्ध करणार आहेत.

रविवार, 22 मार्च, 2009 रोजी सायंकाळी 6.00 वाजता तेरापंथ भवन, केंब्रिज शाळेसमोर, ठाकुर कॉम्प्लेक्स, कांदिवली पूर्व येथे शिवसेना नेते व लोकसभेचे माजी अध्यक्ष श्री. मनोहर जोशी यांच्या हस्ते सदर अहवालाचे प्रकाशन होणार असून भाजपाचे राष्ट्रीय प्रवक्ते श्री रविशंकर प्रसाद प्रमुख अतिथी म्हणून या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भाजपा मुंबईचे अध्यक्ष व आमदार श्री गोपाळ शेट्टी भूषविणार असून महापौर डॉ. शुभा राऊळ कार्यक्रमाच्या विशेष अतिथि असतील. आमदार श्री गजानन कीर्तिकर, उपमहापौर श्री विनोद घेडिया आणि शिवसेना विभागप्रमुख श्री विनोद घोसाळकर सन्माननीय अतिथी म्हणून या कार्यक्रमाला हजर राहणार आहेत.

सदर कार्यक्रमाला नागरिकांनीही मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन श्री योगेश सागर यांनी केले आहे.

**(कार्यालय सचिव)**